# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४६३/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. जे. डी. रॉड्रीग्ज**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (परि.) पी/उत्तर**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त पी/उत्तर यांचे कार्यालय,
१ ला मजला, लिबर्टी गार्डन, मालाड (प) मुंबई -६४

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त पी/उत्तर यांचे कार्यालय,
१ ला मजला, लिबर्टी गार्डन, मालाड (प) मुंबई -६४

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २२.०१.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १०.०१.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र.मु.मा.आ.नों.क्र. ९७४/२०१८ रा.मा.आ.अपील क्र. ४५२/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १३.०९.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांचे पत्र दि. ३०.१०.२०१७ नोंदणीकृत टपालाव्दारे १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियमचे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. अपिलार्थी यांना रेलिंग काढण्याबाबत अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसांत पुरवावी. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १७.१०.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (Maint), बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त पी/उत्तर विभाग, मालाड (प.), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०७.०१.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.), बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ उत्तर विभाग, मालाड (प.), मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि. २७.०१.२०२० रोजी आयोगास सादर केला.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचा अहवाल दि. २७.०१.२०२० आयोगाच्या निदर्शनास आणून नमुद केले की, आयोगाचे आदेश दि.१३.०९.२०१९ च्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांना दि. ०५.१०.२०१९ रोजी उत्तराची प्रत पाठविण्यात आली आहे.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २४.०१.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai